बुधवार, दि १६ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ४४ वा ● किंमत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## प्रवीण गायकवाड यांच्यावर हल्ला करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाईची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** मराठा समाजासाठी लढा देणारे नेते प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या घटनेने संपूर्ण मराठा समाजात संतापाची लाट पसरली आहे. या घटनेतील मुख्य आरोपी दीपक काटे आणि त्याच्या साथीदारांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कठोर कारवाई करून तत्काळ अटक करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर मराठा क्रांती मोर्चा जालना यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयात धडक देत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटलं आहे की, प्रवीण गायकवाड हे गेल्या अनेक वर्षांपासून मराठा आरक्षण, समाजहिताच्या विविध प्रश्नांवर संघर्ष करत असून, अशा लढवय्या



कार्यकर्त्यावर सार्वजनिक ठिकाणी हल्ला करणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. त्यामुळे या प्रकरणातील आरोपींना फक्त गुन्हे दाखल करून सोडता कामा नये. त्यांच्यावर मकोका अंतर्गत कठोर कारवाई करत समाजात उदाहरण ठरावा अशी शिक्षा व्हावी.

मराठा क्रांती मोर्चाचे प्रतिनिधी म्हणाले की,

जर शासनाने या प्रकरणात तातडीने कठोर पावले उचलली नाहीत तर राज्यभर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## जालना जिल्ह्यात आज बंदची हाक

### शेतकऱ्यांचे सामूहिक आत्मदहन आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात मागील काही महिन्यांपासून सुरू असलेल्या रास्त मुल्यांकनाच्या मागण्यांसाठीच्या शेतकरी आंदोलनाला आता अधिक तीव्र रूप प्राप्त झाले आहे. या आंदोलनाला समर्थन देण्यासाठी आणि मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बुधवार (दि १६ जुलै) रोजी 'जालना जिल्हा बंद' ची हाक देण्यात आली आहे. सर्व बाधित शेतकऱ्यांनी सामूहिकपणे आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

समृद्धी मार्ग बाधीत शेतकरी आणि नागरिकांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शासनाच्या हलगर्जी धोरणांविरोधात मागील काही काळापासून शेतकरी संतप्त आहेत. याच पार्श्वभूमीवर हे आंदोलन आणखी तीव्र झाले आहे.

**मोर्चात जास्तीत जास्त संख्येने सहभाग घेण्याचे आवाहन**

आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या शेतकरी संघटनांनी आणि आंदोलकांनी या बंदमध्ये जिल्ह्यातील व्यापारी, वाहनचालक, नागरिक, तसेच सर्व समाजघटकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन केले आहे. मोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित राहून शेतकऱ्यांच्या हक्काच्या लढ्याला बळ देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे दुर्लक्ष**

अडीच महिन्यांपासून सुरू असलेल्या आंदोलनाला अद्याप ठोस **पान ३ वर**

## युवा आदर्श

### प्राणी प्रेम ...

उच्चभ्रू सोसायटीत
फिरते रोज श्रीमंती
आकर्षक दिसे चित्र
संध्याकाळी प्रभाती
हायफाय लोक फिरे
डॉगी त्यांचे सोबती
डॉगीचं त्यांना फिरवे
मालक धावे भोवती
डार्लिंग डार्लिंग बोले
स्नेही उमाळा भरती
पुत्र पुत्री आहे जणू
प्रेम त्यांच्यावर करती
तंगडी ती वर करती
प्रात:विंधी सभोवती
बॅडमॅनर्स लटका राग
निशाणे सर्वत्र लावती
आहारात खर्च किती
झोपडी संपूर्ण जगती
सांग गरीबी कुठे असे
प्रगल्भ केवढी प्रगती
प्रगत झालाय समाज
प्राणीमात्रा करी प्रिती
आदर करावा जरासा
कधीतर माणसा प्रति

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## बघ्याची भूमिका सोडा, शेतकऱ्यांच्या जिवाशी खेळ थांबवा!

**दीपक शेळके**

**जालना -** समृध्दी महामार्गामुळे जालना जिल्ह्यातील शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या. त्यांच्या घराच्या व गाऱ्हाण्याच्या जागा उद्ध्वस्त झाल्या. या बदल्यात सरकारने दिली आश्वासने आणि नुकसानभरपाईच्या गोष्टी अजूनही हवेतच विरून गेल्या आहेत. मागील अडीच महिन्यांपासून हे शेतकरी आपली हक्काची मागणी घेऊन रस्त्यावर बसले आहेत. पण दुर्दैव असे की, राज्यातले मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी बघ्याची भूमिका घेतल्याचा आरोप आज आंदोलनकर्ते करत आहेत.


प्रश्न इतकाच नाही की नुकसानभरपाई मिळत नाही. प्रश्न आहे सरकारच्या संवेदनशून्यतेचा! जेव्हा कोणी प्रश्न विचारतो, तेव्हा प्रशासन आम्ही पाहतो, शासनाशी बोलतो अशा उडवाउडवीच्या प्रतिक्रिया देत आहे. त्यातच १६ जुलै रोजी जिल्हा बंद आणि सामूहिक आत्मदहनाचा इशारा ही स्थिती गंभीर आणि धोकादायक आहे. एका लोकशाहीत, आपले लोकप्रतिनिधी, लोकांच्या निवडून गेलेल्या सरकारने अशा टोकाच्या पावलांची वाट पाहणं ही खरोखरच लोकशाहीची थट्टा आहे.

या सगळ्या प्रकरणात शासनाचा हलगर्जीपणा स्पष्ट जाणवतो. एखादा महामार्ग काढताना जनतेला विश्वासात घेणं, योग्य मोबदला देणं, पुनर्वसनाची व्यवस्था करणं ही सरकारची जबाबदारी असते. परंतु येथे ती पूर्णतः झुगारण्यात आली आहे. हा लढा कुठल्याही पक्षविरोधात नसून अन्यायाविरोधात आहे, हे सरकारला समजायला हवं.

लोकशाहीत आंदोलन हे शस्त्र आहे, पण शासनाने ते इतकं दुर्लक्षित केल्यास लोकांना टोकाचा मार्ग निवडण्याशिवाय पर्याय राहत नाही, हे राज्यासाठी लाजिरवाणं आहे.

आज या आंदोलनाचा आवाज केवळ जालना जिल्ह्यापुरता मर्यादित राहिलेला नाही, तो संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचला आहे. शासनाने आता तरी जागं होऊन शेतकऱ्यांशी तातडीने चर्चा करून, न्याय्य तोडगा काढावा. अन्यथा उद्या या आगीत केवळ शेतकरीच नव्हे, तर सरकारची विश्वासार्हताही होरपळून निघेल.

आताच्या स्थितीत आंदोलनाचे रूप दिवसेंदिवस टोकाचं होत चाललं आहे. ही वेळ चर्चा आणि निर्णयाची आहे, दबावाने मोडण्याची नव्हे. कारण शेवटी जनता हीच या लोकशाहीची खरी मालक आहे.




### आमच्या जीवाला भाव नाय का?

#### एका समृध्दी महामार्ग बाधित शेतकऱ्याच्या मनातलं

आमचं गाव, आमची शेती, आमचं घर सगळं गेलं. फक्त आश्वासनं मिळाली. पोरांच्या शिक्षणाची फी थकलीय, घरात आजारी आई औषधाच्या पैसे थकल्यात आणि समोर सरकारकडून निव्वळ वावडं. अडीच महिने झाले आंदोलनाला बसून. उन्हात, पावसात, दिवसा-रात्री रस्त्यावर. एव्हाना किमान कुणीतरी विचारेल, म्हणेल बाबांनो, तुमचं ऐकून घेऊ - पण इथं सत्ताधाऱ्यांना वेळच नाही. ना मुख्यमंत्री येतात, ना उपमुख्यमंत्री - फक्त पोलीस पाठवतात.

सारं जग पुढं चाललंय. पण आम्ही मात्र आपल्या जमिनीच्या नावानं रडतोय. का? कारण ही जमीन आमच्यासाठी फक्त पैसा नाही, ती आमचं जगणं आहे.

आज आम्ही १६ जुलैला जिल्हा बंद आणि सामूहिक आत्मदहनाचा इशारा दिलाय. हे कुणालाही आवडणार नाही, पण आम्ही कशासाठी जगावं? सरकार आमचं काही ऐकणार नसेल, तर या जगण्यात अर्थ काय? आम्ही बेकार आहोत, असं वाटतं सरकारला? कधी एकदा लावतात की आग आमच्या झोपड्यांना, मग बघा पेटणारे आमचे अंगारलेले मन. आम्ही आमच्या जमिनीसाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढू. शेवटी एवढंच सांगतो - आमच्या जीवाला भाव द्या. अन्यथा तुमच्या राजवटीवर एक दिवस असा येईल की हेच तुडवले गेलेले शेतकरी पायदळीच उचलून फेकतील.

# संपादकीय

## आशीर्वाद देणारा व्यवसाय करा !

अवैध दारू साठा जप्त, लाखो रुपयांचा गुटखा जप्त, कोट्यावधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त, शेतामध्ये गांजा पिकवणारा गजाआड, जुगाराच्या क्लबवर धाड, मटक्याच्या अड्ड्यावर धाड, सावकाराच्या जाचाला कंटाळून आत्महत्या, अधिक पैशाचे आमिष दाखवून लाखो रुपयाला गंडा, फसवून जमीम बळकावली या आणि  अशाप्रकारच्या अनेक बातम्या आपण नेहमीच वर्तमानपत्रात वाचत असतो. दररोजच्या वर्तमानपत्रात अशा प्रकारची एक तरी बातमी आपल्याला वाचायला मिळते. विशेष म्हणजे चार वर्षांपूर्वी जेंव्हा देशभर कोरोना  होता,  कोरोनामुळे संपूर्ण देशात लॉक डाऊन घोषित करण्यात आले होते. संपूर्ण देश  कुलूपबंद होता तेंव्हा देखील अशाप्रकारच्या बातम्या वाचायला मिळत होत्या. गुटखा, गांजा यासारख्या अमलीपदार्थांवर राज्यात बंदी आहे. राज्यातील काही जिल्ह्यात दारूवर देखील बंदी आहे मात्र बंदी असतानाही काही महाभाग या बंदीची संधी साधून गुटखा, गांजा बाजारात विकायला आणतात. विशेष म्हणजे हे अमली पदार्थ  ब्लॅकने विकली जातात म्हणजे अधिक पैसे देऊन ती विकले जातात. ज्या जिल्ह्यात दारूवर बंदी आहे तिथे देखील ब्लॅकने दारू विकली जाते. काही ठिकाणी पोलीस आणि प्रशासनाचे हात ओले करून बेधडकपणे या पदार्थांची विक्री केली जाते. जुगार मटका यासारखे अवैध धंदे देखील असेच बेधडकपणे सुरू असतात. वरिष्ठांकडून दबाव आल्यास कारवाईचा दिखावा केला जातो, काही दिवसांनी या अवैध व्यवसायांचा पुनश्च हरिओम होतो. कारण संबंधितांनी सोडलेली लाज. केवळ पैसे कमावणे या एकाच उद्देशाने हे महाभाग समाजाचे आरोग्य धोक्यात आणतात. गुटखा खाल्ल्याने दरवर्षी लाखो लोक कर्करोगासारख्या असाध्य रोगाला बळी पडतात. गुटखा खाल्ल्याने कर्करोग होतो हे माहीत असूनही गुटखा बनवणारे गुटखा बनवतात, विकणारे विकतात आणि खाणारे खातात. दारूबंदीचा फक्त फार्स केला जातो. ज्या भागात दारूबंदी आहे त्या भागात तर जास्त दराने दारू विकली जाते. ड्राय डे च्या दिवशीही दारू ब्लॅकने विकली जाते. दारूमुळे लाखो कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. दारूमुळे संसाराची राखरांगोळी होते. दारू पील्यामुळे यकृताचा आजार होतो. त्या आजारात जर घरातील कर्त्या पुरुषाचा मृत्यू झाला तर त्याची लेकरे बाळे उघड्यावर पडतात हे माहीत असूनही लोक दारू पितात कारण त्यांना ती सहज उपलब्ध होते. जुगार आणि मटका खेळून अनेकजण कर्जबाजारी झाले आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी सावकाराकडे जाण्याची वेळ अनेकांवर येते.  सावकाराकडून काढलेले कर्ज फेडता न आल्याने काहींनी  आत्महत्या केल्या आहेत. मटका जुगारामुळे जमीन जुमला विकण्याची वेळ काहींवर आली आहे. हजारो लोकांचे आयुष्य उध्वस्त करणारे, समाजाच्या आरोग्याची नासाडी करणारे कर्करोगासारख्या असाध्य रोगाचा विळखा घालून मृत्यूसमीप नेणारे उद्योग कोणी करू नये अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा असली तरी हे सारे सुरूच आहे याचे कारण हे व्यवसाय करणाऱ्या महाभागांना याचे काही देणेघेणे नाही त्यांना हवाय तो फक्त पैसा.  पैशासाठी सर्वकाही ! या उक्तीप्रमाणे हे लोक काम करतात. यांना कोणाच्या संसाराचे देणेघेणे नाही की कोणाच्या आरोग्याचे. यांचा उद्देश केवळ आणि केवळ पैसा कमावणे हाच आहे. आपला पैसा कमावण्याचा व्यवसाय हा कोणाचा तरी संसार उध्वस्त करणारा असेल तर त्या पैशातून आपल्याला समाधान मिळेल का ? याचा विचार संबंधितांनी करावा. ज्यांचा संसार उध्वस्त झालाय, व्यसनांमुळे ज्या घरातील कर्ता पुरुष देवाघरी गेलाय त्या घरातील लोक या लोकांना शिव्याशापच देत असतील.  तेंव्हा असा शिव्या शाप मिळणारा व्यवसाय करण्याऐवजी लोकांचे आशीर्वाद मिळतील असा व्यवसाय संबंधितांनी करावा.

---

### पान १ वरुन

## जालना जिल्ह्यात ...

प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे शेतकरी वर्गात प्रचंड असंतोष पसरला आहे. शासनाने त्वरीत ठोस निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या मागण्यांची पूर्तता करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करावे लागेल, असा इशाराही आंदोलकांनी दिला आहे.

या जिल्हा बंदमध्ये सर्व सामान्य नागरिक, व्यापारी, तरुणाई आणि विद्यार्थी वर्गानेही सहभागी होऊन शेतकऱ्यांच्या लढ्याला पाठींबा द्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# सुविचारांचा जागर करणारे आत्मचरित्र 'जागरण'

लेखक, कविवर्य, वात्रटिकाकार श्री. भारत सातपुते यांचे 'जागरण' हे आत्मचरित्र वाचनात आले. पुस्तकाचे मुखपृष्ठ




अत्यंत आकर्षक आणि बोलके आहे. आत्मचरित्राचा नायक म्हणजे स्वत: लेखक. त्याच्या जीवनातील बहुतांश काळ यात शब्दबद्ध केला जातो. कुठल्याही आत्मचरित्राची सुरूवात लेखकाच्या बालपणापासून होते. लेखकाचा अतीशय सामान्य कुटुंबात झालेला जन्म, हालाखीत गेलेले बालपण आणि शिक्षणासाठी केलेला संघर्ष पुस्तकाच्या पूर्वार्धात आहे. रस्त्यावर ओरडत चालले तर ''ते खायला घे'' म्हणून आईजवळ रडत बसायचे. आईकडे कुठले पैसे ? केसावर बंबई मिठाई मिळायची. आईने विंचरून न्हाणीच्या तुराटयांनी खचून ठेवलेले केस त्याला देऊन आमचे लाड पुरवायचे. दोन चार दिवसाला पुन्हा तो आला की पुन्हा आईजवळ हट्ट धरायचा, तवा आई चिडून म्हणायची, ''आता कुठून घेऊ, मेले केसही जास्त गळत नाहीत ?'' 'कान तुटलेली काटवट अन एका बाजुला पळी व दुस-या बाजूला उलथने असलेले आई बरीच वर्ष जपू जपू वापरीत होती. सांडस नसल्याने पदराने धरून चुलीवरले भगुने उतरून घ्यायची. एकाच परातीत दोघे दोघे जेवायचे कारण घरात दोन दोनच जरमनच्या पराती, वाटया, तांबे असायचे. त्यातला मोठा तांब्या तर हागणदारीलाही वापरायचे. पुन्हा राखेने घासून खंगाळून तोच तांब्या पाणी प्यायला घ्यायचे'. अशा आणि ब-याच प्रसंगातून लेखकाच्या बालपणीची हालाकीची परिस्थिती सचित्र उभी करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत.

शिक्षक म्हणून सेवा काळात विविध परीक्षेत घेतलेली कॉपी विरोधी भूमिका, प्रभारी मुख्याध्यापक म्हणून काम करताना विद्यार्थी हितासाठी घेतलेल्या कठोर भूमिका यातून निर्माण झालेले शत्रु व त्यामुळे आलेली अनेक संकटं यात चित्रीत करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार लेखकांनी उघडपणे मांडला आहे. ऊस तोड कामगारांसाठी शासनाने सुरू केलेल्या हंगामी वस्तीगृहाच्या चालकांनी राजकीय नेत्यांच्या आणि शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिका-यांच्या पाठींब्यामुळे केलेली कोटयावधी रूपयांच्या शासकीय निधीची लुट आणि लेखकाने हा भ्रष्टाचार रोखण्यासाठी केलेले प्रयत्न शिक्षण क्षेत्राचे वास्तव दाखवणारे आहेत. हल्ली पुरस्कार कसे मिळतात, याचे यथोचित वर्णन लेखकाने केले आहे. जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचा प्रभारी मुख्याध्यापक म्हणून काम करत असताना 'सुट्टी विना शाळा' हा आगळा वेगळा उपक्रम आणि यातच सहकारी शिक्षिकेने दाखल केलेला खोटा विनयभंगाचा गुन्हा यामुळे प्रशासनाने या उपक्रमाकडे केलेले दुर्लक्ष, सेवानिवृतीनंतर पेन्शन साठी केलेला संघर्ष अशा अनेक प्रसंगातून लेखकाचा एकूण जीवनसंघर्ष व शिक्षकी पेशाशी असणारी प्रामाणिकता लक्षात घेण्याजोगी आहे.

आत्मचरित्र लिहिणे खूप कठिण असते. कुठल्याही आत्मचरित्रात लेखकाचे संपूर्ण जीवन कधीही येत नाही. शिवाय काही घटना-प्रसंगांचे विस्मरण झालेले असते. मात्र ज्या काही घटना आठवतात आणि महत्वाच्या वाटतात त्या अगदी बारीक सारीक तपशिलासह लेखकाने मांडल्या आहेत. आपल्या आयुष्याकडे तटस्थपणे पाहणे अवघड असते. ते ज्याला जमते तो आपल्या वर्तनाचा वस्तुनिष्ठ विचार करू शकतो. परखड आत्मपरीक्षण करू शकतो आणि प्रामाणिकपणे आपल्या आयुष्याचा पट वाचकांसमोर उभा करू शकतो. जागरण' या आत्मचरित्रा द्वारे गत जीवनाचा आलेख तटस्थपणे काढण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. तशी भारत सातपुते यांची आणि माझी फार ओळख नाही आणि प्रत्यक्ष कधी भेट ही नाही परंतु या आत्मचरित्र वाचनातून हा व्यक्ती आणि त्यांचे एकूण व्यक्तीतत्व कसे असेल याचे चित्रच माझ्यासमोर उभा टाकले. हे आत्मचरित्र लेखकाला वाचकांच्या नजरेत सामान्याकडून असामान्याकडे नेणारे आहे. आम्हा वाचकांना सुद्धा प्रेरणादायी आहे. 'जागरण' हे आत्मचरित्र सुविचारांचा जागर करणारे आहे. मी काही अभिजात लेखक, साहित्यिक किंवा समीक्षक नाही. माझ्या परीक्षणाची भाषा अलंकारिक, साहित्यिक चौकटीत कदाचित बसणार नाही. जवळपास ६० पुस्तके प्रकाशित असणाऱ्या श्री. भारत सातपुते यांच्या आत्मचरित्राचे परीक्षण करण्याइतका मी नक्कीच मोठा नाही. श्री. भारत सातपुते यांच्या 'जागरण' या आत्मचरित्रास माझ्या खूप-खूप शुभेच्छा !



**पुस्तक : जागरण**
**लेखक : भारत सातपुते (८०८७६९५०००)**
**प्रकाशक : मांजरा प्रकाशन, लातुर**
**पृष्ठे : ३०२, किंमत : ६०० रुपये**

**पुस्तक परीक्षण**
**सुरेश मंत्री, अंबाजोगाई.**
**संपर्क : ९४०३६५०७२२**

***

### वाचकांचे मनोगत

## तृतीय पंथीयांनी स्वत:च परिवर्तन करावे !

नवी मुंबईतील वाशी येथील ' लेटस सेलिब्रेट फिटनेस ' संस्थेच्या सौजन्याने  सफाई अपना ओ , बिमारी भगा ओ ' आयोजित करण्यात आलेल्या अभियानात तृतीय पंथीयांनी सहभाग घेतला.त्यामुळे यांच्यातील आत्मविश्वास दिसला.ते समाजातील इतर वर्गा प्रमाणे चांगले जीवन जगू शकतात. त्याकरिता त्यांनीच स्वतः आपल्यातील परिवर्तन घडवून आणावे.महाराष्ट्र शासनाने यांना अनेक सवलती देऊन इतर वर्गाच्या बरोबरीने नोकरीत प्राधान्य दिले आहे.त्यांना आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र,इत्यादी कागद पत्रे मिळणार आहे.तसेच, जनगणना होणार आहे.या पंथातील लोकांनी हिडीस प्रथा बंद करून नोकरीच्या संधी शोधाव्या .त्यांच्या जीवनात चांगले बदल होतील. रेल्वे प्रवासात प्रवाशांच्या पुढे हात पसरणे, जंक्शन सिग्नल येथे वाहनचालकांपुढे हात पसरणे काही दिले नाही तर अपशब्द बोलणे , एखाद्या वस्तीत नूतन बालक जन्मले असेल तेथे जाऊन धिंगाणा घालणे बंद करावे.कोणी कोणाला शाप दिले म्हणून कोणाचे काही बिघडत नाही.नाहीतर भारत - पाक देशातील वैर शापाने संपले असते.या भाकड कथा आहेत. लोकांनी अशा भाकड कथा पासून लांब राहावे.कठोर परिश्रमा शिवाय पर्याय नाही हेच खरे .या समूहातील लोकांना लघु उद्योग, सुरक्षारक्षक, साफसफाईची कामे करून उदरनिर्वाह करता येतील. इतर वर्गातील स्त्री - पुरूषाप्रमाणे स्वतः मध्ये परिवर्तन घडवून आणू शकतील एवढा आत्मविश्वास त्यांनी निर्माण करावा.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई,**
**९८६९४७६२०९,** mahadeogolvaskargmail.com

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत)  आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744,  Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827  Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# माणुसकी फाऊंडेशन तर्फे स्नेहांकुर प्रकल्प परतुर येथे शैक्षणिक साहित्य वाटप



**परतूर । प्रतिनिधी -** येथील माणुसकी फाउंडेशन तर्फे स्नेहांकुर निवासी प्रकल्पातील विद्यार्थी यांना स्कूल बॅग, वाटर बॅग, कंपास पेटी, वही वाटप करण्यात आले.

माणुसकी फाउंडेशन तर्फे आपलंही समाजाचं काहीतरी देणं आहे या हेतूने स्नेहांकुर मधील सर्व विद्यार्थी यांना शैक्षणिक साहित्य भेट दिले. माणुसकी फाऊंडेशन अध्यक्ष राजेश मुंडलिक, सचिव मनिष अग्रवाल, सदस्य भारत सवणे, श्रीकांत ठाकरे, अरुण गुंजकर, पांडूरंग पोटे, लक्ष्मीकांत सवणे, कुनाल शहाणे, गजानन साखळकर , विकास वेडेकर, धिरज भंडारी, गोंविद कातारे, रविद्र काळे, बाबासाहेब कदम तसेच स्नेहांकुर प्रकल्प परतुर अध्यक्ष प्रदीप कातारे उपस्थित होते.

# तरुण वयात गोर-गरीब व समाजाच्या सुख-दुःखात उपयोगात येणाराच खरा नायक - जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर

**जालना । प्रतिनिधी -** वाईट गोष्टी व कृत्ये तसेच हिरोगिरी करून स्वतःमध्ये नायक शोधणारे अनेक तरुण खर्या अर्थाने स्वतः ला फसवत असतात. तर समाजातील नागरिकांच्या अडीअडचणी प्रसंगी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणारे त्यांना वेगवेगळ्या प्रसंगात मदत करणारे तरुणच खर्या अर्थाने समाजाचे नायक असल्याचे मत शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर शहरातील शाकुंतल नगर भागातील मीनाक्षी हॉस्पिटल येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विभागप्रमुख आशिष बोकन यांनी डॉक्टर्स डे निमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख देवनाथ जाधव, शहरप्रमुख बाला परदेशी यांची प्रमुख उपस्थिती होती. तर डॉ.नाम देव वाघ, डॉ.सुलोचना वाघ, डॉ.कैलास सचदेव, डॉ.सतीश शेकडे, डॉ.योगेश नेम ाने यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

पुढे बोलतांना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले कि, इतरांचे सुख-दुःख आपले सुख-दुःख मानून त्यांच्यासाठी झटणारा इतरांसाठी आजारपणत, दुर्घटनेत, अडी-अडचणी प्रसंगी व आनंदाच्या क्षणीही रहिवाशासोबत उभा राहणारा तरुण महत्वाचा आहे. कोणते तरी निमित्त शोधून लोकोपयोगी उपक्रम राबवून समाजाची सेवा करणारा तरुणच खऱ्या अर्थाने समाजाचा नायक असल्याचे जिल्हाप्रमुख अंबेकर यांनी सांगितले व शिबिराच्या आयोजानाबद्दल आशिष बोकन यांचे कौतुक केले. या रक्तदान शिबिरात अनेक तरुणांनी मोठ्या प्रम




ाणावर रक्तदान केले.

तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक आशिष बोकन यांच्यासह अक्षय बोकन, ज्ञानेश्वर केंद्रे, सागर बोकन, योगेश काळे आदींनी प्रयत्न केले.

# दिवंगत पत्रकारांच्या नावे स्तंभ बनवा - विकासकुमार बागडी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात दिवंगत पत्रकारांच्या नावे एकही स्तंभ नसून या पत्रकारांचे मोलाचे योगदान राहिलेले असून त्यासाठीच त्यांच्या ही नावे शहरात एखादा तरी स्तंभ असावा आणि तो जालना शहर महापालिकेकडे व्हाईस ऑफ मिडियाचे प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी यांनी केली आहे.

यासंदर्भात श्री. बागडी यांनी म्हटले आहे की, जालना जिल्ह्यात सामाजिक आणि राष्ट्रीय काम करणारे सामाजिक कार्यकर्ता, राजकीय कार्यकर्ता, स्वातंत्र्य सैनिक, उद्योजक, माजी सैनिक आदींच्या नावाने शहरात अनेक रस्ते, चौक, कमान बांधण्यात आलेले आहेत. पण या सर्वांची कामाची प्रसिध्दी करणारे चौथा स्तंभ म्हणजेच पत्रकारितेच्या नावे कुठेही आणि कोणत्याही चौकात किंवा रस्त्यावर एकही स्तंभ नाही. जालना शहराच्या मध्यभागी म्हणजेच टाऊन हॉल येथे पत्रकारांसाठी स्वतंत्र स्तंभ उभारण्यात यावा, जिल्ह्यात दिवंगत



झालेल्या पत्रकारांच्या नावे असा पत्रकार स्तंभ असेल तर तो चांगलाच आहे. शशिकांत पटवारी, उदय पटवारी, लक्ष्मण पायगव्हाणे, गणेश जळगांवकर, सतीष सुदामे, दिगंबर शिंदे, रमण गायकवाड, मनोहर बुजाडे, श्रीकृष्ण भारुका, शेख अलीम, अबुल हसन, राजेंद्र तिरुखे, लक्ष्मीनारायण पिपरिये, लक्ष्मीनारायण गौड, सुरेंद्र जैस्वाल, रतनलाल कुरिल, चंद्रकांत शहाणे, अनिल खंदारे आदी अनेक पत्रकार असे आहेत की, त्यांनी आपले संपूर्ण जीवन पत्रकारितेला वाहिले, परंतू त्यांच्या नावाने शहरात एखादाही स्तंभ असू नये, ही खेदाची बाब म्हणावी लागेल. म्हणूनच या सर्व दिवंगत पत्रकारांची आठवण म्हणून तरी जालना शहर महानगर पालिकेने एखादा स्तंभ शहरात उभारावा, अशी विनंतीही व्हाईस ऑफ मिडियाचे प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी यांनी केली आहे.

# प्रवीण दादा गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध!

**मंठा । प्रतिनिधी -** अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे राज्यस्तरीय नेते प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर भाजपशी संबंधित गुन्हेगारी प्रवृत्तीच्या दीपक काटे याने साथीदारांसह शाईफेक करत भ्याड हल्ला केला. या घटनेचा मंठा तालुक्यात तीव्र निषेध होत असून, आज संभाजी ब्रिगेड, मंठा शाखा आणि समविचारी संघटनांच्या वतीने तहसीलदारमार्फत मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना निवेदन सादर करून तत्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

संभाजी ब्रिगेडच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, प्रवीण दादा गायकवाड हे बुद्ध, शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम गेली अनेक वर्षे करत आहेत. त्यांनी अनेक बहुजन तरुणांना स्वावलंबी व उद्योजक बनवले आहे. अशा व्यक्तीवर सराईत गुन्हेगारांकडून हल्ला होणे म्हणजे वैचारिक क्रांतीला गप्प करण्याचा कट असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

हल्लेखोर दीपक काटे हा केवळ गुन्हेगार नसून, भाजपच्या एका शाखेचा प्रदेश सचिव असल्याची माहितीही निवेदनात नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे फक्त पोलिस कारवाई नव्हे, तर त्याला पक्षातून हकालपट्टी करावी, अशी जोरदार मागणी ब्रिगेडने केली.

जर कारवाई झाली नाही, तर 'जशास तसे' उत्तर देण्यास आम्ही मागे हटणार नाही. कायदा-सुव्यवस्थेच्या परिणामांना शासन जबाबदार राहील.

असा ठाम इशारा देत संभाजी ब्रिगेड, मंठा, तसेच समविचारी संघटना, सम ाजबांधव व विविध राजकीय-सामाजिक पक्षांच्या वतीने हे निवेदन तहसील कार्यालयात सादर करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे ता.अध्यक्ष बाळासाहेब खवने,प्रा. डॉ.पांडुरंग नवल,सुभाष जाधव,शेख ऐजाज,आसाराम झोल,एकनाथ काकडे,शरद बाहेकर,शरद घारे,प्रल्हाद शिरसाट, एकनाथ जाधव, अशोक हिवाळे,योगेश वायाळ, राजेश काळे,कृष्णा पवार,विशाल देशमुख,धोंडीराम घोरसड, शिवाजी शेवाळे,ताहीर बागवान,दिनकर बागल, गौतम मगर,केशव खराबे,नारायण ढाकरगे,भारत उघडे आदी उपस्थित होते.

## रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटतर्फे गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप

# फक्त शिक्षणच कुणाच्याही जीवनाची दिशा बदलू शकते - उमेश बजाज

**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटतर्फे येथील गांधी चमन परिसरातील श्री शिवाजी हायस्कूलमधील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक वसंत घुगे हे होते. या प्रसंगी क्लबचे अध्यक्ष उमेश बजाज, सचिव शरद गादिया, कोषाध्यक्ष विजयालक्ष्मी बाले, राजेंद्र अग्रवाल, प्रकल्प प्रमुख रवींद्र हुसे, सदस्य गिरधर लधानी, संगीता गादिया, प्रदीप भारजवाल, अनिता सैबी, विनोद देशमुख, सुनिता देशमुख आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना क्लबचे अध्यक्ष उमेश बजाज म्हणाले की, सध्या प्रातिनिधिक स्वरूपात १५ गणवेश वितरित करण्यात आले असून, शाळेकडून प्राप्त होणाऱ्या मागणीनुसार अधिक विद्यार्थ्यांसाठी गणवेश उपलब्ध करून दिले जातील. त्यांनी डॉ. अब्दुल कलाम, महेंद्रसिंह धोनी यांच्या संघर्षमय जीवनाची उदाहरणे देत विद्यार्थ्यांना परिस्थितीवर मात करत शिक्षणात सातत्य ठेवण्याचे आवाहन केले. आजची परिस्थिती उद्याचा निर्णय घेत असते. शिक्षण ही एकमेव संधी आहे, जी कोणाच्याही जीवनाची दिशा बदलू शकते. गरिबी, अडचणी, संकटं या सगळ्यावर मात करता येते फक्त जिद्द हवी. प्लास्टिकचा वापर कमीत कमी करून, बाजारात जाताना घरून कापडी पिशवी घेऊन जाण्याबाबत आई-वडिलांना सांगावे तसेच आपल्या घरी प्लास्टिक असेल तर ते शाळेत जमा करावे. आठ दिवसाला ते संकलित करून पुनर्वापरासाठी पाठवण्यात येऊन हरित जालना संकल्पनेला मूर्त रूप देऊयात, अशी साद त्यांनी घातली.

मुख्याध्यापक वसंत घुगे यांनी रोटरी क्लबच्या या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक करताना सांगितले की, या शाळेत प्रामुख्याने सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिक्षण घेत आहेत. अशा उपक्रमांमुळे त्यांना नवा आत्मविश्वास मिळतो. शिक्षण टिकवण्यासाठी सम ाजाचा असा हातभार फार महत्त्वाचा ठरतो.

प्रारंभी प्रकल्प रविंद्र हसे यांनी या प्रकल्पाचा उद्देश विशद करून, यापुढेही असेच उपक्रम राबविण्यावर आमचा भर राहील, अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रशांत भाले यांनी केले. या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आता तलाठ्यांची कामे जिल्हाधिकाऱ्यांना करावी लागणार का?

## ॲड. महेश धन्नावत यांचा संतप्त सवाल; खरेदीखतावरून नामांतरण न करणाऱ्या महसूल प्रशासनावर उपरोधिक टीका

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात विशेषतः मंठा तालुक्यात खरेदीखतावर आधारित नामांतरण करण्यास महसूल विभागातील तलाठी टाळाटाळ करीत आहेत. यामुळे नागरिकांची कामे रखडत असून, प्रशासनाची भूमिका संपूर्णपणे उदासीन आहे. या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. महेश धन्नावत यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत, जर तलाठी नाव लावत नसतील, उपविभागीय अधिकारी जबाबदारी टाळत असतील, तर आता जिल्हाधिकाऱ्यांनीच ही कामे करावीत का? असा उपरोधिक प्रश्न उपस्थित केला आहे.

त्यांनी यासंदर्भात थेट राज्यपालांकडे तक्रार दाखल करून जालना जिल्ह्यातील महसूल प्रशासनाचा निष्क्रिय व बेजबाबदार कारभार त्यांच्या निदर्शनास आणून दिला आहे.




**खरेदीखत असूनही नामांतरण रखडलेले - प्रशासनाची दुर्लक्षवृत्ती**

ॲड. धन्नावत यांनी दिलेल्या माहितीनुसार, खरेदीखताच्या आधारे मंठा तालुक्यातील अनेक नागरिकांनी जमिनींच्या नोंदीसाठी अर्ज दाखल केले होते, परंतु आजतागायत त्या अर्जावर कारवाई झालेली नाही. याच संदर्भात, ४ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना त्यांनी स्पष्ट नोटीस बजावली, ज्यामध्ये खरेदीखतावर आधारित नामांतरण तत्काळ करावे, अशी मागणी केली होती. मात्र, तीन दिवसांत उत्तर देणे तर दूरच, ही नोटीस फक्त फाईलमध्ये ठेवली गेली आणि त्यानंतरही वारंवार पाठपुरावा करूनही काहीही निर्णय घेण्यात आलेला नाही.

**तलाठी व उपविभागीय अधिकारी जबाबदारी झटकत आहेत**

ॲड. धन्नावत यांचे म्हणणे आहे की, खरेदीखताच्या आधारे नामांतरण करणे हे कायद्यानुसार स्पष्ट असून, यामध्ये कोणताही गोंधळ किंवा दुमत नसताना तलाठी स्वतःच्या मनाने नोंदी रोखून ठेवत आहेत. तेवढ्यावर न थांबता, संबंधित उपविभागीय अधिकारीही हे अधिकार आमच्याकडे नाहीत असे सांगून जबाबदारी झटकत आहेत. त्यांनी विचारले आहे की, कायदा आहे की निव्वळ सल्ला? आणि तलाठ्यांनी जर नाव लावले नाही तर जिल्हाधिकारी काय करणार?

**पूर्वीही दिले गेलेले आदेश धाब्यावर**

विशेष म्हणजे, याच प्रकारच्या प्रकरणांवर यापूर्वी अपर जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश काढून स्पष्ट केले होते की खरेदीखतावर आधारित नामांतरण करणे हे महसूल अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. पण हे आदेशदेखील महसूल यंत्रणेकडून धाब्यावर बसवले जात असल्याचे चित्र आहे. मंठा येथील तहसील कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांना या प्रकरणांची माहिती असूनही, ते याकडे दुर्लक्ष करीत असल्याचेही ॲड. धन्नावत यांनी निदर्शनास आणले.

**जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे**

या प्रकारामुळे सामान्य नागरिकांची कामे रखडली असून, त्यांना न्याय मिळण्याचा मूलभूत अधिकार हिरावला जात आहे. त्यामुळे या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालावे, अन्यथा प्रशासनातील निष्क्रियता आणि बेजबाबदारीमुळे नागरिकांचा शासनव्यवस्थेवरचा विश्वासच उडेल, असा इशाराही ॲड. धन्नावत यांनी दिला आहे.

हा प्रश्न फक्त एका अर्जदाराचा नाही, तर संपूर्ण जिल्ह्यातील नागरिकांच्या न्यायहक्कांचा आहे. जर अधिकारी जबाबदारी टाळत असतील, तर मग शासन यंत्रणेवर विश्वास कसा ठेवायचा? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

जालना जिल्ह्यातील महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर या प्रकरणामुळे पुन्हा एकदा संशयाची सावली पडली आहे. आता जिल्हाधिकारी स्वतः या विषयात पुढाकार घेतात का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. अन्यथा, सामान्य नागरिकांसाठी न्याय मिळविणे अधिक कठीण होणार, यात शंका नाही.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला शिवसेनेचा आर्थिक आधार

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील बाबुलतारा येथील शेतकरी राजेभाऊ देविदास काळे यांनी दुष्काळ, नापिकी आणि बँकेचे ८० हजार कर्ज यामुळे नुकतीच आत्महत्या केली. काळे हे केवळ एक एकर जमिन कसून आपला व परिवाराचा उदरनिर्वाह करत होते. त्यांचे वय फक्त ३२ वर्ष होते. राजेभाऊ यांच्या पश्चात वयोवृद्ध आई - वडील, पत्नी, एक १० वर्षाचा मुलगा व एक १४ वर्षाची मुलगी आहे. जेव्हा एखादा शेतकरी आत्महत्या करतो तेव्हा त्याचे कुटुंब उद्ध्वस्त होते. राजेभाऊ काळे यांनी आत्महत्या केल्यामुळे काळे कुटुंबाला दुःख आणि दुःखाचा सामना करावा लागत असताना त्यांना नैतिक आणि मानसिक आधार देण्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख महेशभैय्या नळगे व उपजिल्हाप्रमुख माधवराव मामा कदम यांनी सांत्वन पर भेट दिली. व शेतकऱ्याच्या पश्चात संकटात सापडलेल्या काळे



कुटुंबाला स्वनिधीतून आर्थिक मदत देत शिवसेनेचा माणुसकीचा हात पुढे केला. या भेटीद्वारे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केवळ सहानुभूतीच नव्हे तर हक्काचा आधार दिला. शेतकरी आणि कुटुंबासाठी शिवसेना नेहमीच सज्ज आहे, हे अधोरेखित केले. याप्रसंगी गावकरी शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.




# शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे हे सामाजिक दायित्व - डॉ. कृष्णा कोरडे

## कलावती-पोदार लर्न स्कूलचे उदघाटन

**विशाल देशमुख**



**जाफराबाद -** तालुक्यातील ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गंगा आणण्यासाठी कलावती फाउंडेशनद्वारा संचालित 'कलावती-पोदार लर्न स्कूल' या शाळेचा भव्य उद्घाटन सोहळा रविवार, १३ जुलै रोजी पार पडला. या कार्यक्रमाला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील, माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, माजी राज्यमंत्री अर्जुन खोतकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी कलावती फाउंडेशनचे संस्थापक डॉ. कृष्णा कोरडे म्हणाले, भोरखेडा ही माझी जन्मभूमी आहे. या तालुक्यातील अनेक हुशार, होतकरू मुलांना योग्य संधी मिळत नाही. त्यामुळे दर्जेदार शिक्षणासाठी ते शहरी भागात धाव घेतात. मात्र, आर्थिक व सामाजिक अडचणींमुळे अनेक मुले शिक्षणापासून वंचित राहतात. त्यामुळेच ग्रामीण भागातच उच्च दर्जाची शाळा उभारण्याचा संकल्प केला.

**पालकांचे स्वप्न आता आपल्या गावात**

डॉ. कोरडे यांनी पुढे सांगितले की, अनेक पालक आपल्या मुलांना चांगले शिक्षण द्यायचे स्वप्न पाहतात. पण त्यासाठी शहरात स्थलांतर करणे त्यांना शक्य होत नाही. हीच गरज लक्षात घेऊन 'कलावती-पोदार लर्न स्कूल' सुरू करण्यात आले आहे. या शाळेमार्फत विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा, दर्जेदार शिक्षकवर्ग, आणि संपूर्ण स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने तयारी मिळणार आहे. ही शाळा ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आयुष्यात मोठा बदल घडवून आणेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी ग्रामीण शिक्षणासाठी उचललेल्या या पावलाचे कौतुक करत, शाळेच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षण हे परिवर्तनाचं प्रभावी साधन आहे. ग्रामीण भागात अशी शाळा उभारणे ही सामाजिक बांधिलकीची जाणीव आहे, असे वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी केले. 'कलावती-पोदार लर्न स्कूल' हे केवळ एक शैक्षणिक केंद्र नसून, जाफराबाद तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी एक नवीन संधी आणि उज्ज्वल भविष्याची वाट ठरणार आहे. हे पाऊल सामाजिक बदलाचे सशक्त उदाहरण ठरेल, यात शंका नाही.

